Impact Factor 2. 147

ISSN 2349-638x

Reviewed International Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III | ISSUE-VII | July | 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# "काळाच्या गरजेनूसार प्राथमिक शिक्षणातील बदल"

**प्रा. कुलकर्णी कांचन प्रकाश**
प्राचार्य आनंद अध्यापक विद्यालय, बुधोडा,
ता. औसा जिल्हा लातूर (महाराष्ट्र)

**प्रास्ताविक :-**

मातृभाषेची चार प्रमुख कौशल्यं आपण मानतो . ऐकणे, बोलणे, वाचणे व लिहिणे. मूल हे कोणत्याही संस्कृतीमध्ये वाढलेले असो, सर्वप्रथम बालकाच्या सर्वांगिण विकासाची सुरुवात होते ती मातृभाषेतूनच. बालकाला नवनविन ज्ञान प्राप्ती होते ती सर्व प्रथम त्याच्या मातृभाषेतूनच. बालके विविध भूमिकांचे निरिक्षक करता करता ज्ञानग्रहण करतात व त्यातूनच भावनिक जोड निर्माण होऊ लागते. बालकांची निरिक्षण क्षमता जसजशी वाढीस लागते तसतसा त्याचा सर्वांगिण विकास झपाटयाने होत जातो. पहिल्या सहा महिन्यात बालक फक्त ओळख व बोलीभाषा यांचे ज्ञान प्राप्त करीत असल्यामुळे त्याच्यावर मातृभाषेचा पगडा बसू लागतो.

बालकाचे व्यक्तिमत्व व ओळख ही त्याच्या उपरोक्त चार कौशल्यांवर निश्चित होऊ लागते. शिक्षणाची उमेद्वारी ही जन्माने सुरु होते व मृत्यूने संपते. बालकाच्या शिक्षणाबाबत भारतात म्हणावे तेवढे गांभिर्य अजूनही दिसून येत नाही.

**शिक्षण पध्दती :-**

शालेय शिक्षणाची सुरुवात होत असतांना बालकांना मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण देणे जास्त हितावह ठरते. त्याचे कारण म्हणजे जन्मल्यापासून बालकाच्या इंद्रियांवर जे भाषेचे, ज्ञानाचे, आघात होत असतात ते मातृभाषेशी निगडीत असतात. मुल सर्व प्रथम आपल्या मातेची भाषा अवगत करते. मग ती बोली भाषा असो किंवा हावभावातून दर्शविली जाणारी भाषा असो. मुलाची वैचारिक क्षमता वृध्दिंगत होत असतांना ती सर्वप्रथम मातृभाषेला प्रतिसाद देते. त्यातून निर्माण होणारे अर्थबोध हे त्याबालमनावर कायमचे ठसले जातात. यातूनच बालकाची आवड व नावड तयार होण्यास सुरुवात होते. मातृभाषेतून सुरु केलेले ज्ञानग्रहण हे अनुभवजन्य असल्यामुळे त्याची पाळेमुळे खोलवर रुजण्यास मदत होते. यातूनच बालकाचा भाषिक विकास होत असतो.

मुले मोठी होत असतांना त्यांची बुध्दीच नव्हे, तर सर्वच व्यक्तिमत्व विकसित होत असते. काही दुदैवी मुलांच्या मनावर परिस्थितीचे जे आघात होतात त्यामुळे त्यांचे जीवन खुरटून, करपूर जावू शकते. परिस्थिती अनुकुल असूनही घरात चांगले संस्कार झाले नाहीत, किंवा चांगले शिक्षक लाभले नाहीत तर मुलांची बौध्दिक व मानसिक वाढ नीट होत नाही. याउलट घरात प्रेमळ वातावरण असले आणि शाळेत जाणते आणि सहृदय शिक्षक लाभले तर मुलांच्या मनाला उभारी येते. त्यांचे व्यक्तिमत्व बहरु लागते.

मुल शाळेत जाऊ लागते तेव्हा मातेव्यतिरिक्त शिक्षकांचा ठसा त्या बालमनावर बसू लागतो. म्हणूनच पूर्वप्राथमिक शाळेपासून निदान माध्यमिक शाळेच्या अखेरीपर्यंत मुलांना फार छान शिक्षक मिळायला हवेत. एखाद्या विषयाची किती माहिती ते देतात याच्याइतकंच तो विषय बालकांना आवडेल याची काळजी ते किती घेतात हे महत्वाचं ठरतं. लहान मुलांच्या वर्गावर शिकविण्यासाठी जातांना रविंद्रनाथ टागोर खूप तयारी करत असत. शिक्षकाचे श्रेष्ठत्व हे पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक स्तरावर चांगलं शिकवून सिध्द करता येते. मुलांना कोणतीही नविन गोष्ट करता आली की

ती आनंदित होतात. त्यांना आनंद मिळावा अशा रितीने ऐकणे, बोलणे, वाचणे व लिहिणे इत्यादी कृती आत्मसात करता आल्या पाहीजेत.

अभ्यासक्रमामध्ये समाविष्ठ करण्यात आलेले सर्वच विषय महत्वाचे असतात. मात्र त्यातील एखादाच विषय त्या बालकाचा आवडता विषय बनून जिवनसाथी बनतो. तो विषय बहुतेक करुन मातृभाषा हाच असतो. आजच पूर्वप्राथमिक शिक्षण हे अगदी रेघोट्यांपासून सुरु होते व काही ठराविक टप्पे पार करुन क्रमाक्रमाने विकसित होत असते. लिखानामध्ये अक्षरलेखनातील आनंद विद्यार्थ्यांना या रेघोट्या किती प्रभावी आत्मसाद करता आल्या त्यावर अवलंबून असते. तसेच शब्दलेखन आणि वाक्यलेखन हे त्या अक्षरलेखनावर आधारित होऊन बसते. म्हणूनच अक्षरलेखन, शब्दलेखन आणि वाक्यलेखन मुलं आनंददायक प्रक्रियेतून कितपत शिकता यावर त्यांच्या पुढील लेखनाचा , शिक्षणाचा कस अवलंबून आतो.

आज गल्लोगल्ी निघालेल्या पूर्वप्राथमिक शाळा माध्यमनिहाय अक्षरं शिकविण्याची महान कामगिरी करतात. मात्र या महान कामगिरी बाबत त्यांचा कितपत गांभिर्य आहे. याचा शाळाचालकांनी विचार करावयास हवा.

प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी म्हणजेच इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेण्यासाठी बालकाचे वय हे ६ प्लस असले पाहिजे असा शासनाचा दंडक आहे. परंतु याचा अर्थ मुलाने वयाची पाच वर्षे पूर्ण होईपर्यंत काहीच शिक्षण घेतले नाही असा होत नाही. तो स्वत: बोलायला शिकला, तसेच इतरांनी बोललेलं समजून घ्यायला शिकला हे कौशल्य प्राप्त करीत असतांना त्याने सुमारे पाच हजारापेक्षाही अधिक शब्दांचे भांडार स्वत:जवळ जमविलेले असते. हे सर्व भांडवल जमा करण्यासाठी घेतलेले शिक्षण हे सहज शिक्षण होय. या सहज शिक्षणासाठी बालकाला शाळेसारख्या औपचारिक शिक्षणसंस्थेतून कित्येक वर्षे घालवावी लागली असती .

जॉन होल्ट म्हणतात How Children learn हे जॉन होल्ट या जगप्रसिध्द लेखकाचं अतिशय सुंदर पुस्तक आहे. मुलांचं बोलणं आणि त्यांचं लिहिणं यांचा परस्परसंबंध सांगतांना त्यांनी फार मार्मिक विवेचन केलं आहे. ते म्हणतात, “This low of skill and interest in talking affects every subject in the standard curriculum. For example, take writing. A child, who does not talk will not have many things that he wants to say and hence will not know what to write about. He will often feel that nothing he might want to say or write could possibly be of any interest to anyone else and that if he did say or write something others would only laugh at it. At fast, as thoughts come to him, he censors them, rules them out when he does try to express his putting words together. Because he had never learned in practice what kind of things make speech clear, forceful and effective. He will have no way to judge the worth of his own writing. The test of good writing is not whether it obeys lows of grammer, but what it sounds like. It a student does not know what good talk sounds like, all the rules of grammer will not enable him to write well.” याश्विाय लेखनासाठी मुलांना दिले जाणारे ठराविक व निर्जीव विषय, विषयांबाबत होणारी नीरस चर्चा, ठराविकच मुद्दे आणि ठराविकच ओळींच्या आग्रहातून आटोपता घेतलेला लेखनातील ओढून आणलेला जिवंतपणा, शिक्षकाकडून होणारी लेखनाची तपासणी, काढल्या जाणाऱ्या चुका, दिले जाणारे शेरे अशी कितीतरी काराी मुलांचं जिवंत लेखन मरुन जायला आणि त्यांची लेखनाची इच्छाच कोमेजून जायला कारणीभूत असतात.

बालकांचे शिक्षण हे त्यांच्या कलेने झाले पाहिजे, म्हणजे अगदीच त्यां त्या वर्गातील बालकांची आवड निवड ही व्यक्तीपरते भिन्न भिन्न असू शकते. पारंपारिक पध्दतीचे शिक्षण हे कालबाह्य होत आहे. आज पूर्व प्राथमिक शिक्षण घेत असलेल्या बालकाला ज्याप्रमाणे २५ -३० वर्षापूर्वी मिळणारे अध्ययन साहित्य होते ते बदलले आहे. कुटुंब ,

वस्ती, गांव,निसर्ग, परिसर, समाज अशा अध्ययन साहित्यापासून त्याचे अध्ययन सुरु होत असे. मात्र आज परिस्थितीमध्ये अमुलाग्र बदल झालेला आहे. त्यामध्ये जन्मल्यापासूनच नजरेसमोर येणाऱ्या प्रत्येक गोष्टींचे बालक निरिक्षण करु लागला आहे. त्याच्या सभोवतालचा परिसरच आता आधुनिक बनत चालला आहे. त्याची भूक ही बदललेली असून त्याच्या भूकेप्रमाणे त्याला बौध्दिक आहार मिळाला पाहिजे. आजही आपण शालेय स्तरावर क्रमिक पुस्तके, अभ्यासक्रम, वह्या, पेन अशा साधनाचा वापर जर केला तर जग कुठे चालले हे बालकच आपणास दाखवून देण्यास कमी पडणार नाही.

**समारोप :-**

प्राथमिक शाळांमधील एक ते चार वर्ग म्हणजे मूलांच्या भावी शिक्षणाचा पाया असतो. तो भक्कम असावयास हवा. संपूर्ण जीवनरुपी इमारतीचे वजन त्याला पेलावले गेले पाहिजे. म्हणूनच वाटत की, या चार वर्गांमध्ये मुलांना मातृभाषेतून आधुनिक विचारप्रवाहाव्दारे, उपकरणांव्दारे, साहित्यांव्दारे अध्ययन साहित्य निर्माण झाले पाहिजे. व त्या सभोवतालच्या अद्ययावत् साहित्यांच्या माध्यमाव्दारे त्याची शब्दसंपत्ती खूप वाढायला हवी. वाक्यरचनांवर त्यांची चांगली पकड निर्माण व्हायला हवी. मनात येणारे विचार, भावना आणि कल्पना बोलून अथवा लिहून सांगायला त्यांना आवघड जाऊ नये. आत्मविश्वासानं, सहजतेनं त्यांनी बोलावं, लिहावं, एवढेच नव्हे तर लिहिणे म्हणजे जणू स्वत:चं असणं आहे असं त्यांना कुठेतरी जाणवलं पाहिजे. या दृष्टिने विचार केला तर प्राथमिक स्तरावर पाच-सहा शव्दांचीच वाक्यं असावीत, अमुर्त विषय लेखनासाठी देऊ नयेत. या स्तरावरील व्यक्तिमत्वाचा दरवळ त्यांच्या लिखाणाला असण्याची अपेक्षा धरणं अवास्तव, या मुलांच्या लेखनाला कसली आली आहे शैली ? अशा प्रकारची विचारधारा शिराधार्य माणून शिक्षकांनी काम करायला हवं, असं मला वाटत नाही. केवळ क्रमिक पुस्तकांतील शब्दांच्या, आतील आशयाच्या आणि प्रश्नोत्तरांच्या तटबंदीमध्ये आरामशीर राहणाऱ्या शिक्षकांना माझं वरील विधान कितपत मान्य होईल याची शंकाच वाटते. या संदर्भात कविवर्य रवींद्रनाथ टागोरांच्या `दोन पक्षी` या कवितेतील पुढील ओळी आठवतात.

`वनातला पक्षी म्हणे, "आकाश घननीळ
त्यात नाही कसलाच अडथळा,"
पिंजऱ्यातला पक्षी म्हणे, "हो, पण तेथे
नीटपणे झाकता कशा येतील पिंजऱ्याप्रमाणे चारी बाजू? "

शिक्षकांनी सुध्दा स्वत:च ठरवलं पाहिजे की, आपण आणि आपल्याविद्यार्थ्यांनी फक्त क्रमिक पुस्तकांच्या सोनेरी पिंजऱ्यात शांतपणे राहण्यात आनंद मानायचा , की स्वत:लाआणि विद्यार्थ्यांना या बदलत्या विश्वाच्या मेघांवर झोकून देऊन स्वत:च्या क्षमता पारखत, जोखत आपल्या पंखांची ताकद वाढवायची. मुलांचं `असणं` विविधांगांनी फुलावं, समृध्द व्हावं म्हणून आपण प्रयत्नशील रहावं. तरच मुलांच भवितव्य त्यांच्या परीच्या शैलीनं समृध्द झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :-**

१) शिक्षण समिक्षा , केशरी प्रकाशन, अमरावती 2015 पृष्ठ क्र. 26
२) आधुनिक शिक्षणाचा प्रवाह, आलोक पब्लिकेशन्स, नवी मुंबई , 2012 पृष्ठ क्र. 156.
३) केशव शिक्षण, श्री पब्लिकेशन्स, सोलापूर 2014, पृष्ठ क्र. 69.
४) लिहिणं मुलांचं: शिकवणं शिक्षकांचं, उन्मेष प्रकाशन, 2006, 15,16,20,137.